# ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ३२ वा ❑ मंगळवार दि.०४ मार्च २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### लोकलुभावन योजना फास ठरत आहे

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीच्या सरकारने अनेक लोकलुभावन योजना जाहीर केल्या त्यात महायुतीला मोठा फायदा झाला महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं. यानंतर देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री झाले तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे उपमुख्यमंत्री झाले. मागील अडीच वर्षाच्या काळात महायुती सरकारनं अनेक महत्त्वाकांक्षी योजना राबवल्या. यामुळंच महायुतीला जनतेनं कौल दिला असल्याचं राजकीय जाणकार आणि तज्ञ यांनी म्हटलंय. दरम्यान, महायुती सरकारनं अनेक योजना आणल्या होत्या.

निवडणुकीपूर्वी झालेल्या पावसाळी अधिवेशनात सरकारनं अनेक मोठे निर्णय घेतले. तसंच अनेक योजना जाहीर केल्या. नव मतदारांसाठी त्यातील महत्त्वाची योजना ठरली, ती म्हणजे मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना. रोजगार संधी आणि युवांना प्रोत्साहन देणारी ही योजना तरुणांसाठी महत्त्वाची ठरली. या योजनेमुळं महायुती सरकारला एक नवमतदार वर्ग मिळाला. ही योजना तरुणांच्या पसंतीत उतरली. त्यामुळं कित्येक तरुणांनी मोठ्या प्रमाणात महायुतीला मतदान केलं असल्याचं बोललं जातंय. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत (इंटर्नशिप योजना) यामध्ये ५५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून बेरोजगार तरुणांना रोजगार मिळवता आला. या योजनेत बारावी पास, आयटीआय उमेदवार आणि पदवीदारांसाठी कमी जास्त प्रमाणात पगार देऊन इंटर्नशिप देण्यात आली. त्यामुळं ही योजना महायुतीसाठी फायदेशीर ठरली असल्याचं बोललं जातंय.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेची घोषणा पावसाळी अधिवेशनादरम्यान तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली होती. या योजनेच्या माध्यमातून पात्र महिलेला प्रत्येक महिन्याला १५०० रुपये खात्यात जमा करण्यात आले. ही योजना गाव-खेड्यासाठी क्रांतिकारी योजना ठरली. सरकारी आकडेवारीनुसार २ कोटी ७४ लाख महिला या योजनेच्या लाभार्थी आहेत. त्यातील ५०% महिलांनी जरी महायुतीला मतदान केलं असेल तर ते कोटीच्या घरात जातं. त्यामुळं मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना ऐतिहासिक आणि क्रांतिकारी योजना ठरली. दरम्यान, या योजनेला राज्यभरात अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला.याशिवाय

मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, महिलाना बस मध्ये ५० टक्के सवलत योजना, लेक लाडकी योजना. मात्र आता या लोक अनुभव योजना सरकारसाठी फास करत आहे. फडणवीस सरकार या सर्व लोकलूभावन योजनांचा फेर आढावा घेत आहे.यातील काही योजना सरकारच्या अंगलट येत आहे. तात्पुरते घेतले ते आता नोकरी मागत आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनी युवा प्रशिक्षण योजना आणली होती. अप्रेंटिसशिप आणि मासिक दहा हजार रुपये विद्या वेतन असे या योजनेचे स्वरूप होते. ही योजना लागू करताना कायमस्वरूपी नोकरी दिली जाईल असा कोणताही शब्द सरकारने दिलेला नव्हता मात्र आता काही आमदारच सहा महिने काम केलेल्यांना कायम करा अशी मागणी करू लागले आहेत. आंदोलनाची भाषा सुरू झाली आहे. त्यामुळे योजना आता सरकारसाठी फास ठरत आहे. मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेत आतापर्यंत एक लाख २३ हजार युवक युवतींना प्रत्येकी सहा महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात आले त्यांना ३४१ कोटी रुपयांचे विद्यावेतन त्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात आले. सरकारी कार्यालयांमध्ये प्रशिक्षण घेतलेल्यांची संख्या ७८, ४३२ तर खाजगी क्षेत्रातील संख्या ४०,२२५ आहे.

लाडकी बहीण योजना अंगलट येताच सरकारने या योजनेचा फेरआढावा घेतला. निकषात बसत नसत नसल्याचे कारण पुढे करत सुमारे पाच लाख महिलांना योजनेतून वगळण्यात आलं आहे. त्याच प्रमाणे शिंदे सरकारने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अतत्यारीतील रुग्णालयाच्या साफसफाईसाठी पाच वर्षात ३१९० कोटी रुपयांचे कंत्राट देण्यात आले होते पण आता ते स्थगित करण्यात आले आहे.

# पु. ल. देशपांडे म्हणजे राज्याचा हॅप्पीनेस इंडेक्स-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## नूतनीकृत पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या नव्या संकुलाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण

ज्योतिर्मय साहित्य

**मुंबई –** महाराष्ट्राचा हॅप्पीनेस इंडेक्स म्हणून पु. ल. देशपांडे यांचे कार्य असून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीत महत्त्वाची भर त्यांनी घातली आहे. त्यांची विनोदबुद्धी आणि भाषाशैली तसेच त्यांच्या साहित्यातून मिळणारा आनंद निखळ होता. कला व सांस्कृतिक क्षेत्रातील मराठी कलाकारांचे तसेच रसिकाचे योगदान मोठे असून संगीत क्षेत्रात लता मंगेशकर, भीमसेन जोशी, आशा भोसले, नाटक आणि सिनेमा क्षेत्रात श्रीराम लागू, निळू फुले तर साहित्य क्षेत्रात वि. स. खांडेकर, पु. ल. देशपांडे, त्याचबरोबर लोककला आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीत अण्णाभाऊ साठे यांनी पोवाड्यातून मोठे योगदान दिले आहे. संस्कृती आणि सभ्यता यांचे मूल्यमापन त्याठिकाणी जोपासल्या गेलेल्या साहित्य, संस्कृती आणि भाषेमुळे होते, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

सांस्कृतिक कार्य विभागाच्या अंतर्गत असलेल्या पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या नूतनीकृत संकुलाचा लोकार्पण सोहळा आज मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते संपन्न झाला. या सोहळ्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, आमदार कालिदास कोळंबकर, भाई गिरकर, अपर मुख्य सचिव विकास खारगे, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, मराठी माणसाने नाटकाप्रती आपले प्रेम जोपासले आहे. नाटकाचे अनेक प्रयोग होतात, देशात या क्षेत्रात मराठी कलावंतांचे काम महत्त्वाचे आहे. गायक, कवी, साहित्यिक, कवी आदी सगळ्यानी आपली कला, साहित्य, संस्कृती याचे जतन करून आपल्या लोकांचे जीवन समृद्ध केले आहे. पु.ल.अकादमी सारख्या वास्तू भविष्यात राज्यात तयार होतील. कवी, साहित्यिक रवींद्रनाथ टागोर यांच्या नावाला साजेशे काम इथे झालेले आहे. मात्र, हे सातत्य पुढे टिकले पाहिजे, अशी अपेक्षा मुख्यमंत्री फडणवीस व्यक्त केली.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, राज्य सरकारने अत्यंत कमी वेळात या अकादमी आणि नाट्यगृहाचे नूतनीकरण केले आहे. कवी व साहित्यिक रवींद्रनाथ टागोर आणि ज्येष्ठ साहित्यिक पु. ल. देशपांडे यांच्या नावाला साजेसे काम याठिकाणी होत आहे. सध्या गावोगावी नाट्य मंदिराची अवस्था वाईट आहे. यासाठी सांस्कृतिक कार्य विभागाने निधीची मागणी करावी, यासाठी निधीची कमतरता पडणार नाही, अशी ग्वाही श्री. पवार यांनी यावेळी दिली.

सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार म्हणाले, ''कला साधक मंडळींच्या साधनेची जागा म्हणजे ही पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आणि रवींद्र नाट्य मंदिर आहे. त्यामुळे ही एक पवित्र वास्तू असून, सर्वार्थाने पावित्र्य टिकवणारी वास्तू आहे. त्यामुळे सांस्कृतिक उन्नती करणारे कार्यक्रम येथे होतील. आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपट महोत्सव २१ ते २४ एप्रिल २०२५ ला पु. ल. अकादमीत होईल, अशी घोषणाही सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.शेलार यांनी यावेळी केली. सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव तथा मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव श्री. खारगे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, तर पु.ल. देशपांडे कला अकादमीच्या संचालिका श्रीमती जोगळेकर यांनी आभार प्रदर्शन केले. तत्पूर्वी मुख्यमंत्र्यांनी चित्र प्रदर्शन, मिनी थियेटरचे क्लिप वाजवून तर पु.ल. कला अकादमीचे घंटानाद करून उदघाटन केले.



### नूतनीकृत संकुलाची वैशिष्ट्ये

- ✻ रवींद्र नाट्य मंदिराच्या जुन्या इमारतीत आधुनिक सुविधा देत नवीन अंतर्गत सजावट व तांत्रिक सुधारणा करण्यात आल्या आहेत.
- ✻ अत्याधुनिक सभागृह, खुले नाट्यगृह, नॅनो सभागृह, ऑडिओ-विज्युअल स्टुडिओ आणि एडिटिंग सुट्सची नव्याने उभारणी करण्यात आली आहे.
- ✻ लघु नाट्यगृहात डॉल्बी ॲटमॉस ध्वनी यंत्रणा, चित्रपट प्रदर्शन व्यवस्थेची निर्मिती करण्यात आली आहे.
- ✻ अकादमीत वादन कक्ष आणि सृजनकक्षही विकसित, तसेच पु.ल.देशपांडे यांचे स्मृतिदालन देखील सुरु करण्यात आले आहे.
- ✻ या ठिकाणी नवोदित कलाकारांसाठी नवीन २० अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहेत.
- ✻ जहांगीर आर्ट गॅलरीच्या दर्जाची आर्ट गॅलरी याठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली आहे.
- ✻ मराठी चित्रपटांच्या स्क्रिनिंगसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.
- ✻ एवढ्या दर्जेदार व्यवस्था असलेल्या देशातील नाट्यगृहांपैकी रवींद्र नाट्य मंदिर हे एक नाट्यगृह आहे.

# आचरणात आणण्यासारखे खूप काही

ज्योतिर्मय साहित्य

माणसाच्या जीवनाबाबत विचार करावयाचा झाल्यास शत्रू मित्रता आणि त्यातून उद्भवणारे राग, द्वेष आणि प्रीती हे त्रांगडं म्हणजेसध्याच्या माणसाचं जीवन आहे, असं म्हटलं तरी वावगं होणार नाही. अशा या मानवी शत्रू मित्रत्वाचा अभ्यास ज्योतिषशास्त्र करतं.माणसाला जीवनी आपल्या मित्रत्वापेक्षा त्याच्या शत्रूचं अधिक भान असतं. त्यामुळे, सध्याचा माणूस हे एक भलंमोठं प्रदूषणच होऊन बसलं आहे. आणि या प्रदूषणात डोकं खुपसून डोकं खाजवणारा ज्योतिषीसुध्दा या प्रदूषणाचाच एक भाग होतो.

माणसाच्या जीवनात प्रेमाचे, लाभाचे, लोभाचे व जिव्हाळ्याचे अनेक स्पंदने असतात. तसेच, श्रावण महिना म्हणजे, सुध्दा वातावरणातील एक स्पंदनच आहे. मात्र हे स्पंदन जाणून घेता यावे यासाठी माणसाच्या अंतरंगात शुध्द सत्व तत्व जागे व्हावे लागतात. तरच, श्रावणातील स्पंदनांची अनुभूती माणसाला अनुभवता येते आजूबाजूच्या वातावरणातील नाजूक, प्रेमळ अशा संभाषणाच्या संवादाकडे माणसाचे कान टवकारले जात नाहीत. पण, कुठे भांडण झाले, हाणामारी झाली किंवा ॲक्सीडेंट झाला की, लगेच माणसांचे कान त्या दिशेकडे टवकारले जातात. लगेच माणसे त्या ठिकाणी धाव घेतात. पण, प्रत्यक्ष त्या ठिकाणी ती माणसे योग्य मदत करण्यापासून दूर राहतात. याचं कारण, म्हणजे या कलियुगी सध्याच्या काळात त्यांच्या अंगात मानवी स्पंदने निर्माण न होता राक्षसी स्पंदने निर्माण झाली आहेत. त्यामुळे, निसर्गाचं श्रावण महिन्यातील गोंडस, मनमोहक, लाघवी



मधुकर निलेगावकर, पुणे

तसेच, नयनमनोहर असं रुप त्यांच्या हृदयाचा ठाव घेत नाही. कारण, सध्या माणसाची अंतर्बाह्य दृष्टीच बदललेली आहे. सात्विक संवेदनांची जाणीवच माणसाची कमी झालेली आहे, पण, भांडणं, मारामारीकडे लगेच माणसांचे कान टवकारले जातात. हाच आजकालचा कलिधर्म झाला आहे

आजकालच्या या वातावरणात आसुसलेली आजूबाजूची पिशाच्च कान टवकारुन भांडणं, वादविवाद ऐकण्याच्याच तयारीत असतात.या वातावरणात हल्ली देवदेवतांचा वास कमीच असतो. कारण, घराघरांतून श्रावणाचं स्वागत करणारा, श्रावण महिन्यात स्वतःच्या घराचं, आजूबाजूच्या परिसराचं वातावरण प्रसन्न करणारा माणसाचा संवाद, कोमल व मधूर सूर आता सहसा कुठेही दिसून येत नाही. श्रावण महिना कसा असतो याचं सुरेख, मनमोहक असं वर्णन सुप्रसिद्ध कवी मंगेश पाडगावकर यांनी त्यांच्या भावगीतात ५० वर्षांपूर्वीच केलं आहे. ती खरी श्रावण महिन्याची अनुभूती आहे. तशी अनुभूती घराचं तसेच, सामाजिक वातावरण प्रसन्न ठेवून तुम्हीही घेवू शकता. त्यामुळे, सद्गृहस्थांनो, मित्रांनो अशा पिशाच्च शक्तींना, पिशाच्च विचारांना कदापिही जवळ फिरकू देवू नका. त्यासाठी गुरुभक्तानो श्रावणी पौर्णिमेच्या श्रीगुरुला छान साद घालत गुरुभक्तीच्या तेज:पुंज प्रांगणात नादमधुर श्रवणभक्तीचा मनसोक्त आनंद प्रकाश आणि दीपदर्शनातून अनुभवत वातावरणातील संशय पिशाच्चांना हद्दपार करूया ! तसेच, सदैव निरोगी प्रसन्न वातावरणात समृद्ध जीवनजगूया !

## लक्षवेधी छायाचित्र....



हे पेंटिंग नसून हे आहे जि. प. प्रा. शा. पाचपिरवाडी केंद्र- डोणगाव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथील शाळेतील मुलांच्या कल्पकतेतून साकारलेले शाळेतील वर्गाचे छत, इयत्ता ७ वी च्या विद्यार्थ्यांनी सृजनशिलतेतून (नवनिर्मिती) आपल्या शाळेतील टिनच्या छताला जूनी वर्तमान पत्रातील महत्वपूर्ण रंगीत चित्रे , बातम्या, जागतिक घडामोडी कात्रणे कटींग करून वर्गाच्या छताला चिकटवून वर्गाची सजावट रंगबेरंगी केली. याबद्दल त्यांच्या परिसरातील पालकांकडून विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

( छायाचित्र : प्रदिपगुरुजी पिंपळनेरकर)

# मुलींनी सक्षम होणे काळाची गरज-ॲड. राजेंद्र गाडे पाटील

ज्योतिर्मय साहित्य

महिला सबलीकरण व आत्मरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या निर्भय कन्या अभियान अंतर्गत शंकरराव भेलके महाविद्यालय येथे निर्भय कन्या अभियान कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत अमृतेश्वर कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयातील २५ विद्यार्थ्यांनी, अनंतराव थोपटे महाविद्यालय भोर येथील २५ विद्यार्थ्यांनी तसेच महाविद्यालयातील ४० विद्यार्थीनींनी स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण घेतले. तसेच आत्मविश्वास वाढवण्यासाठी विविध मार्गदर्शन सत्र घेण्यात आली. कार्यशाळेचे उद्घाटन प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ ॲड. राजेंद्र गाडे पाटील व जितेन्द्र भगत कराटे प्रशिक्षक यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी महिलांच्या सशक्तीकरणाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की,



''स्वसंरक्षण हा प्रत्येक मुलीचा मूलभूत हक्क असून, आत्मनिर्भरता आणि आत्मविश्वास हेच स्त्रीसुरक्षेचे खरे हत्यार आहेत.''या कार्यक्रमात श्री जितेन्द्र भगत यांनी विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाच्या तंत्रांची माहिती दिली तसेच कराटे प्रात्यक्षिकांचे आयोजन केले. उपस्थित विद्यार्थिनींनी या कार्यशाळेचा मोठ्या उत्साहाने लाभ घेतला आणि आपल्या सुरक्षिततेबाबत अधिक जागरूक होण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ तुषार शितोळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विकास अधिकारी डॉ सचिन घाडगे यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांना महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि कार्यालयीन कर्मचारी यांनी सहकार्य केले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थिनींना यापुढेही अशा उपक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले.

✻✻✻




– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

## आनंदी पहाट...

### आनंदप्राप्ती हीच खरी मोठी यशप्राप्ती

**ज्योतिर्मय साहित्य**

आपल्या अंतर्मनाला, अंतरात्म्याला शांती मिळणे मानसिक स्वास्थ्यासाठी अत्यंत आवश्यक असते. आपल्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याच्या धावपळीत आपण आपली मुलभूत गरजच विसरून जातो, त्याची जाणीवच आपल्याला होत नाही. आपल्या जीवनातील सार कशात आहे, हे आपण स्वतःच शोधून काढायचे असते. त्याच्यासाठी आपल्या अंतरात्म्याचा शोध घेण्याची, त्याला समजून घेण्याची, त्याचा यथायोग्य विचार करण्याची जरुरी असल्याची आपल्याला जाणीव असलीच पाहिजे.

आपल्या मनात येत असलेल्या प्रत्येक विचाराचा परिणाम कमी अधिक प्रमाणांत आपल्या मानसिकतेवर होत असतो. नकारात्मक विचारांचा विपरीत परिणाम होत असतो, तर सकारात्मक विचार यशप्राप्तीसाठी उपयुक्त ठरतात. आपल्या प्रत्येक कृतीपूर्वी विचार होण्याची जरुरी असते. आनंदप्राप्तीसाठी सकारात्मक विचारांचा माध्यम म्हणून उपयोग करण्याची आपल्याला सतत जाणीव होणे आवश्यक असते.

आनंदाची गोडी अवीट असते, त्यामुळे आनंदप्राप्तीचा कधीच वीट येत नाही. आनंदाची प्राप्ती करण्यासाठी सकारात्मक विचार, वर्तन, व्यवहाराची गरज असते. त्यायोगेच सकारात्मक वातावरणाची निर्मिती होऊ शकते. आनंदाची निर्मिती आपल्याच अंतरंगांत करावी लागत असते. आनंद प्राप्ती म्हणजेच खरी यशप्राप्ती असते; हे ज्या व्यक्तीला समजते, त्याच व्यक्तीला त्याच्या जीवनातील सार कशात आहे, हेही कळू शकते. अंतरात्म्याला शांती मिळणे अत्यंत जरुरीचे असते, कारण त्यातच खरा आनंद असतो. आपल्या दैनंदिन गरजा भागवताना आपण केवळ शरीराचाच विचार करत असतो. अन्न, वस्त्र, निवारा ह्या तीनही गरजा खरे तर आपल्या शरीरासाठी आवश्यक असतात. आपल्याला त्या व्यतिरिक्त अजून एका गोष्टीची गरज असते, ती म्हणजे शांतीची.


## ‘ लाभले आम्हास भाग्य...’

**ज्योतिर्मय साहित्य**

तरी आज अशी वेळ का येते की आम्हाला म्हणावे लागते की मराठी भाषा जगवली पाहिजे, वाढवली पाहिजे ? त्याचे कारण आम्ही तिचे पुत्र आहोत, तिचे वारस आहोत, तिचे पांग आम्हाला फेडायचे आहेत हे आम्ही कुठेतरी विसरतो. वर्षभरातून एकदा मराठी दिवस आला की आम्हाला मराठीचा अभिमान उरी दाटून येतो. पण पुन्हा वर्षभर गायब ! आमच्या मुलांना आम्ही अट्टाहासाने इंग्रजी शाळेत घालतो. मराठी शाळा ओस पडत चालल्या आहेत. इंग्रजी भाषा म्हणून शिकणे आजच्या काळासाठी आवश्यक आहेच याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. पण यासाठी मातृभाषेचा बळी द्यायला हवा का याचा विचार आपण करणार आहोत की नाही ? मावशीसाठी आईचा बळी द्यायचा का ? आम्ही आमच्या मुलांना आता ‘ चिऊ काऊ ‘ नाही शिकवत.



आमचा काऊ म्हणजे आता गाय. चिऊ म्हणजे . भू भू म्हणजे कुत्रा नाही. आता डॉगी म्हटले जाते. ‘ आई ‘ म्हणुनी कोणी आईस हाक मारी, ती हाक येई कानी. पण ती हाक आता नाही येत कानी. जिकडे तिकडे ‘ मम्मी शब्द कानावर पडतो. इंग्रजीत प्रेताला मम्मी म्हणतात. मम्मी म्हणताना ओठ मिटले जातात तर आई म्हणताना तोंड उघडले जाते. आ होतो. केवढा मोठा फरक ! ‘ टी व्ही वरच्या साबणाच्या एका जाहिरातीत एक छोटी मुलगी आपल्या आईला ‘ मम्मी ‘ म्हणून हाक मारते. आणि मग ‘ किती सुंदर आहे. .’ मम्मी सुद्धा, रॉक स्टार सुद्धा असे इंग्रजाळलेले उद्गार कानी येतात. मोबाईलवर मराठी टाइप करताना मराठीचे जे काही खून पडतात ते तर भयानकच ! ऱ्हस्व, दीर्घ तर अजून पुढचा भाग...! त्याबद्दल मी इथे जास्त बोलत नाही.



## उगवतीचे रंग


विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

म्हणून आमच्या मुलांना आवर्जून मराठी शाळेत टाकले पाहिजे. त्यांना सुदर मराठी पुस्तके वाचायला दिली पाहिजेत. त्यांची गोडी लावली पाहिजे. आधी आपण पालकांनी लावली पाहिजे. मराठी पुस्तके विकत घेऊन वाचली पाहिजेत. मराठी बोला, मराठी चाला, मराठी खा, मराठी प्या, मराठी झोपा, मराठी जागा, मी मराठी, बाणा मराठी, जात मराठी, पंथ मराठी, धर्म मराठी असे अंतर्बाह्य मराठीमय व्हा. आता होळी येते आहे. तेव्हा असा ‘ असा अवघा रंग एक झाला..’ पाहिजे. ती खरी होळी. असे जेव्हा होईल तेव्हा मराठी जगेल, वाचेल, वाढेल. फक्त मराठी दिन साजरा करून नाही भागणार.

सुरेश भटांच्या ओळींनी शेवट करू या

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म पंथ जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी.

***



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

### तमोगुण लक्षण


**ज्योतिर्मय साहित्य**

मनामधे दुष्टबुध्दी धरून जो दुसऱ्या चे कमालीचे नुकसान करतो. जो सदैव ऊन्मत व ऊर्मट वर्तन करतो. सतत कुठेतरी भांडणतंटा होत रहावा, ज्याच्या मनामध्ये सतत द्वेष पेटत असतो जो अस्थिर बुध्दीचा असतो. तो तमोगुण होय. जो भक्ती करतो त्याच्या भक्ती मध्ये विघ्ने आणतो देवालये तोडतो, सतत असुरी भावना मनमधे असते. ज्याला सत्कर्म आवडत नाहीत. चांगली फळे येणारी झाडे तोडावीत, समाजात दुही निर्माण करावी जेणेकरुन समाज अस्थिर होईल त्या वेळी अशी माणसे खुष असतात. लोकांना पीडा देणे, निर्दयी पणे वागणे,भ्रष्टाचार करणे, ब्राम्हणांना दिलेली वतने, वर्षासने, निर्वाहची साधने नष्ट करणे. हा तमोगुण होय. प्राणी मात्रांना ऊगाचच दुःख देतो, ज्याला मोठमोठ्या चुका करण्याची सवय आहे. जो कोणी त्याला सदाचार शिकवतो पण तो कुणाचेही ऐकत नाही तो तमोगुण होय. जो आगी लावतो, शस्त्राने मारतो, पिशाच्च बाधा करतो, विष खायला देतो, मत्सराने एखाद्याचा जीव घेतो, तो तमोगुण होय. लोकांच्यात भांडणे लावून देऊन आपण फक्त मजा बघत बसतो भरपूर धनद्रव्य जवळ आहे पण अती पैशाच्या लोभापायी अजून अजून कष्ट करून धनद्रव्य जमवतो ते स्वतः साठी परमार्थासाठी खर्च न करता फक्त आणि फक्त साठवून ठेवतो त्याला हे कळत नाही की ऐक दिवस या जगातुन जाण्यासाठी येणार आहे तेव्हा हे सगळं ईथेच रहाणार आहे. हेच ज्याला समजत नाही तो तमोगुणी होय.

ज्याला धर्माचरण, स्नानसंध्या दी कर्मे न करता स्वधर्माचा विसर पडतो. कर्तव्य करत नाही तो तमोगुणी होय.

सारांशधर्माचे नितीनियमांचे पालन करा सदाचार, सद्गविवेक, सतत जाग्रुत ठेऊन समर्थाच्या आदेशाचे पालन करा तुमच्यात असलेला तमोगुण नष्ट करा. भगवंत भक्ती करा.

श्री राम जय राम जय जय राम
जय जय रघूविर समर्थ



## श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

### कर्तव्यात परमात्म्याचे स्मरण

**ज्योतिर्मय साहित्य**

आपले कर्तव्याला न विसरावे । भगवंताचे अनुसंधान राखावे ।। व्यवहाराने योग्य ते कर्तव्य करीत जावे । बाकी रामावर सोपवावे ।। कर्तव्यात परमात्म्याचे स्मरण । यातच सिद्धीचे बीज जाण ।। असा करावा संसार । जेणे राम न होईल दूर ।। देहाने कर्तव्याची जागृति । त्यात ठेवावी भगवंताची स्मृति । कर्तव्यात असते मनाची शांति ।। कर्तव्याचा कधी न पडावा विसर । हृदयी धरावा रघुवीर ।। ऐसे वागेल जो जनी । त्याने जोडला चक्रपाणि ।। उद्योगाशिवाय राहू नये । कर्तव्याला चुकू नये । पण त्यात रामाला विसरू नये ।। ठेवावा रामावर विश्वास । कर्तव्याची जागृति ठेवून खास ।। देहाचा विसर पण भगवंताचे ध्यान । हेच भक्तीचे मुख्य लक्षण ।। देह करावा रामार्पण । स्वत:चे कर्तेपण सोडून ।। शास्त्री पंडित विद्वान् झाला । भगवत्पदी न रंगला । व्यर्थ व्यर्थ त्याचे जिणे ।। भगवंतापाशी राहावे रात्रंदिन । हाच सुखाचा उत्तम उपाय जाण ।। रामाचे चरणी घ्यावी गति । हाच विचार आणावा चित्ती ।। सुटावी प्रपंचाची आस । तेथे परमात्म्याचे प्रेम खास ।। सर्व कर्मांत अधिष्ठान असावे देवाचे । तोच कल्याण करील साचे ।। भले बुरे जे असेल काही । ते सोडावे रामापायी ।। चित्त असावे रामापायी । देहाने खुशाल संसारात राही ।। आपण व्हावे रामार्पण । सुखदु:खास न उरावे जाण ।। धन्य त्याची जननी । ज्याने राम आणिला ध्यानी मनी ।। रामावीण दुजे काही। आता सत्य उरले नाही ।। भाव ठेवावा चित्तात । सुखे आयुष्य घालवावे त्याचे सान्निध्यात ।। ज्याने जिणे केले रामार्पण । त्यासी व्यवहार हेच खरे योगसाधन ।।

‘माझे सर्व ते रामाचे’ । मानून जगात वागणे साचे । अशास नाही कष्ट फार । मागे पुढे रघुवीर ।। आपण व्हावे मनाने रामाचे । राम जे करील तेच घडेल साचे ।। चित्त ठेवावे रामापायी । दुजे मनात न आणावे काही ।। आता न सोडावी हरीची कास । होऊन जावे त्याचे दास ।। दास्यत्वाचे मुख्य लक्षण । मालकावाचून न दुसऱ्याची आठवण ।। भगवंताचा दास झाला । जग मानत त्याला ।। म्हणून आपण सर्व आहो रामाचे दास। हे उरी बाळगावे खास ।। ‘एकच जगती माझा रघुपति’ । याहून दुजा न करावा विचार । हाच ठेवावा निर्धार ।। भाव ठेवता रामापायी । तो कधी कमी पडू देणार नाही ।। मनाने जावे भगवंताला शरण । जो चुकवील दु:खाचे कारण । राम माझी मातापिता । बंधु सोयरा सखा । तोच माझे सर्वस्वाचे ठिकाणी । याहून दुजा विचार मनात न आणी ।

आता सांभाळावे सर्वांनी आपण । रामाविण जाऊ न द्यावा क्षण ।।

## संस्कृती व संस्कार



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

### देण्याचा व घेण्याचा दिवस

**ज्योतिर्मय साहित्य**

निसर्गा कडे सगळ्या गोष्टी भरपूर आहेत. निसर्ग आपल्याला द्यायला पण तयार असतो.पण निसर्गाचा एक नियम असतो.जो पर्यंत तुम्ही काही देत नाही तो पर्यंत निसर्ग पण काही देत नाही. निसर्गाची मागणी खूप कमी असते.तुम्ही एक धान्याचा दाणा द्या.निसर्ग हजारो दाणे देतो.एक बी लावा.निसर्ग जंगल देतो.हाच नियम सगळीकडे असतो.थोडक्यात आपल्याला जे हवे असते त्याचे दान करावे. उदाहरण म्हणजे पूर्वीची दानाची पद्धत आठवून बघू.पूर्वी कोणकोणत्या वस्तू दान दिल्या जात असत ?

समजा एखाद्याला डोळ्यांचा प्रॉब्लेम असेल तर त्याने चष्मे द्यावेत.डोळ्यांच्या हॉस्पिटल साठी दान द्यावे. ज्यांना पायाचा त्रास असेल त्यांनी काठी किंवा पायाचे बेल्ट दान करावेत.

– दाना साठी हेतू महत्वाचा असतो.

सवय लागे पर्यंत ती गोष्ट लक्ष पूर्वक करावे लागते. पोहणे शिकताना जसे सुरुवातीला प्रत्येक कृतिकडे लक्ष द्यावे लागते नंतर ती कृती आपोआप होते. तसेच दानाचे पण आहे. एकदा दानाची सवय लागली की ते निर्व्याज होते.

दान हे फक्त पैशाचेच नसते. दान कशाचे करता येईल ते बघू.

फुल, चॉकलेट, पेन, पेन्सिल, रुमाल कोणतीही छोटी वस्तू

आनंद, कौतुक, सहानुभूती, सदिच्छा.

जमेल तशी मदत करणे

सोबत करणे.

शिकवणे

रस्त्यात मदत करणे

काही जण एक नियम पाळतात.आपल्या कमाईचा एक दशांश भाग गरजू व गरिबांना दान करतात. त्यातून जी सकारात्मक ऊर्जा व आशीर्वाद मिळतात त्यामुळे पैशाचा ओघ वाढतो.

– दानाचे प्रकार पुढील प्रमाणे आहेत.

हे प्रकार कनिष्ठ दाना पासून उच्च दाना पर्यंत आहेत.

१) मनात नसताना ( नाईलाजाने ) दान करणे. – सर्वात कनिष्ठ.

२) आनंदाने दान करु शकतो त्या पेक्षा अगदी कमी दान करणे.

३) मागितल्यावर दान करणे.

४) याचना करण्या पूर्वी किंवा मागण्या पूर्वी देणे

५) कोणाला देत आहोत त्याचे नाव माहिती नसणे.

६) घेणाऱ्याला कोण देतो हे माहिती नसणे.

७) देणारा व घेणारा दोघांचेही नाव एकमेकांना माहिती नसणे.

८) असे दान की ज्या मुळे एखादी व्यक्ती स्वावलंबी होणे. हे सर्वोत्तम दान आहे.

एक उदाहरण बघू.आठवड्यातून एक दिवस असे करु शकतो.५०/१०० रुपयाचे ५ किंवा १० रुपयात रूपांतर करायचे.व एकेक नोट कुठेही ठेवायची. **(क्रमशः)**



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर


**ज्योतिर्मय साहित्य**

**परिवर्तिनि संसारे मृतः को वा न जायते।**
**स जातो येन जातेन याति वंशः समुन्नतिम् ।।**

अर्थ – या परिवर्तनशील संसारात कोण जन्म घेऊन मरत नाही? पण ख-या अर्थाने तोच जन्म घेतो, जो जन्म घेतल्यावर आपल्या कुळाचा उत्कर्ष साधतो. अर्थात जो कुळाचा उत्कर्ष साधतो, त्याचेच जन्म घेणे सार्थक आहे.

जातस्य हि ध्रुवो मृत्युः। अर्थात जो जन्माला आला, त्याचा मृत्यू अटळ असतो. लाखो माणसे जन्माला येतात आणि मरतात. त्यांची नोंद इतिहास घेत नाही. इतिहास त्यांचीच नोंद घेतो, ज्यांचे जन्मास येणे सार्थक आहे. बरे, जन्मास येणे सार्थक कोणाचे आहे? तर ज्यांनी जन्मास येऊन काहीतरी ठोस कामगिरी बजावली आहे. आपल्या कुलाचा उत्कर्ष साधण्याच्या कार्याचा अशाच प्रकारच्या कामगिरीत समावेश होतो.

## आचरणात आणावे असे



**ज्योतिर्मय साहित्य**

शाळेत असताना सरांनी शिकविले. एखादी रेषा न पुसता छोटी करायची असेल तर, तिच्याखाली तिच्यापेक्षा मोठी रेषा काढा. खुपच अर्थपूर्ण शिकवण होती. आयुष्यालाही ही शिकवण लागु होते. कुणापेक्षा मोठं व्हायचं असेल तर, त्याच्या चांगलेपणावर शिंतोडे उडवुन नाही, त्याचा कमीपणा दाखवुन नाही तर, त्याच्यापेक्षाही मोठे चांगले काम करुनच मोठं व्हायचं. म्हणून कृतज्ञता किंवा धन्यवाद देणे ही शिस्त आहे , परंतु उपकार लक्षात ठेवणे हा संस्कार आहे. अस म्हणतात की काळजी करणारी माणसे मिळायला भाग्य लागतं पण अशी माणसं आपल्याला मिळाली आहेत , हे समजायला ज्यास्त भाग्य लागत.

हृदय हे जगातील, सर्वात मोठे सुंदर मंदिर आहे. हसणाऱ्या चेहऱ्यावर, विश्वास ठेवण्यापेक्षा, हसणाऱ्या हृदयावर विश्वास ठेवावा. कारण असे हृदय, फारच कमी लोकांजवळ असते. क्षणाला क्षण अन् दिवसाला दिवस जोडत, आयुष्य पुढे सरकत असते. कधी तरी, कुठे तरी, केव्हा तरी, असा क्षण येतो, जो अख्खं आयुष्यच, बदलुन टाकतो. फक्त तो क्षण, ओळखता आला पाहिजे. यालाच आयुष्य जगणे म्हणतात. म्हणून माणसाने कितीही प्रयत्न केले तरी अंधारात सावली म्हातारपणात शरीर आणि आयुष्याच्या शेवटच्या काळात पैसा कधीच साथ देत नाही. साथ देतात ती फक्त आपण जोडलेली जवळची माणसच आणि ज्यांना आपण लावलेल्या जीवाची जाणीव असते तेच साथ देतात.



## आरोग्य संजीवनी

### रात्री झोपण्यापूर्वी खा फक्त दोन विलायची

**ज्योतिर्मय साहित्य**

सकाळी पहा याचे कमाल :

विलायची एक सुगंधीत मसाला आहे. गोड पदार्थांची चव वाढवण्यासाठी विलायचीचा वापर केला जातो. विलायचीचा वापर माउथ फ्रेशनरच्या रुपात देखील केला जाऊ शकतो. यामध्ये आयरन आणि रायबोफ्लेविन, व्हिटॅमिन सी आणि नियासिन देखील असते. हे रेड ब्लड सेल्स निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका निभावते. विलायची खाण्याचे अनेक फायदे आहेत. आज आपण पाहुया विलायची खाल्ल्याने होणा-या काही फायद्यांविषयी

१ पचनक्रिया सुरळीत करते

जेवणानंतर अनेक लोक विलायचीचा वापर माउथ फ्रेशनरच्या रुपात करतात. कारण, विलायची नैसर्गिकरित्या गॅसला नष्ट करण्याचे काम करते.

विलायची पचनशक्ती वाढवण्यात, पोटाची सूज कमी करण्यात आणि छातीतील जळजळ संपवण्याचे काम करते.

आयुर्वेदिक ग्रंथांप्रमाणे विलायची पचनक्रियेत मदत करते. जर तुम्हाला अपचनाची समस्या आहे तर रात्री दोन विलायची, अद्रकचा छोटा तुकडा, थोडीशी लवंग आणि धने बारीक करा. हे पावडर गरम पाण्यासोबत घ्या. पोटासंबंधीत सर्व समस्या दूर होतील.

२ श्वासाची दुर्गंधी दूर होते.

विलायचीमध्ये अँटी-बॅक्टेरियल गुण असतात. यासोबतच विलायचीची तिखट चव आणि सुगंध श्वासांची दुर्गंधी दूर करते. ही डायजेस्टिव्हला मजबूत करते.

रोज जेवण केल्यानंतर एक विलायची खा किंवा रोज सकाळी विलायचीची चहा प्या.

३ ॲसिडिटीपासुन आराम

विलायचीमध्ये उपलब्ध असलेले तेल ॲसिडिटीला नष्ट करते. विलायची चावल्यानंतर त्यामधून अनेक प्रकारचे तेल बाहेर पडतात. जे तुमच्या लाळ ग्रंथींना उत्तेजित करतात. यामुळे तुमचे पोट चांगल्या प्रकारे कार्य करते. विलायची खाल्लावर त्यामधील तेल गारवा देते. यामुळेच विलायची चावल्यावर होणारी ॲसिडिटीची जळजळ दूर होते.

४ फुफूसांसंबंधीत आजारांचा नैसर्गिक इलाज :

विलायची दमा, खोकला, सर्दी आणि फुफूसांसंबंधीत आजारांपासुन आराम देते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

आयुर्वेदात इलायचीला एक गरम मसाला मानले जाते. ही शरीराला आतुन गरम ठेवते. विलायचीचे सेवन केल्याने कफ बाहेर पडतो. सर्दी, खोकला किंवा छातीत कफ असेल तर विलायचीचे सेवन केल्याने या समस्या दूर होतात. जर तुम्हाला सर्दी झाली तर वाफ घेताना गरम पाण्याच्या भांड्यात थोडेसे विलायची तेल टाका.

५ एनीमियापासून वाचवते.

एक ग्लास गरम दूधामध्ये एक-दोन चिमुट विलायची पावडर टाका. तुम्ही तुमच्या आवडीनुसार साखर देखील टाकू शकता. एनीमियाचे लक्षण आणि अशक्तपणापासुन आराम मिळवण्यासाठी हे रात्री प्या.

६ कॅंसरपासून बचावते :-


विलायची मॅंगनीजचे एक प्रमुख स्त्रोत आहे. मॅंगनीज एंजाइमच्या स्रावमध्ये महत्त्वाची भूमिका निभावते. हे फ्री रॅडिकल्सला नष्ट करते. याव्यतिरिक्त विलायचीमध्ये शरीरातुन विषारीतत्त्व बाहेर काढण्याचे गुण असतात.


ही कॅंसरपासुन वाचवण्याचे देखील काम करते.

७ हृदयाची गती नियमित करते.

विलायची पोटॅशियम, कॅल्शियमसारख्या खनिजांनी परिपूर्ण असते. यामुळे ही शरीरातील इलेस्ट्रोलिसिस प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका निभावते. विलायची हृदयाची गती नियमित करण्यात मदत करते. सोबतच विलायची ब्लडप्रेशरला नियंत्रित करते. यामुळे जर तुम्ही आपल्या हार्टला नेहमी हेल्दी ठेवू इच्छिता तर नियमित विलायचीचे सेवन करा किंवा विलायचीची चहा पिण्यास सुरुवात करा.

## रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

### रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

हे पित्या, जाग येवो, माझ्या देशाला... स्वातंत्र्याच्या त्या स्वर्गात. या कवितेत त्यांनी त्यावेळी जी अपेक्षा व्यक्त केली आहे, ती आजच्या परिस्थितीला देखील लागू पडते. किंबहुना दिवसेंदिवस अधिकच अशा गोष्टींची गरज आहे. भयशून्य चित्त, उन्नत मस्तक या सारख्या गोष्टी शिक्षणातून निर्माण व्हायला हव्यात. खरंच त्या तशा होतात का ? अब्राहम लिंकनने हेडमास्तरांस पत्र यात ज्या अपेक्षा त्या व्यक्त केल्या आहेत, त्यांच्याच जवळ जाणारी ही कविता आहे. रवींद्रनाथांच्या साहित्यासंबंधी आणखी पुढील भागात जाणून घेऊ या.

रवींद्रनाथ म्हणजे बहुमुखी प्रतिभा लाभलेलं व्यक्तिमत्व होतं. खरं तर त्यांना त्यांच्या घरच्या मंडळींनी वकिलीचं शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला पाठवलं होतं. परंतु त्यांचं मन तिथे फारसं रमत नव्हतं. मात्र नाट्य, संगीत, कला इ. विषयांची आवड त्यांच्या रक्तातच असल्यानं त्याचा आस्वाद त्यांनी इंग्लंडमध्येही घेतला. त्यातल्या बऱ्याच गोष्टींचा त्यांच्या व्यक्तिमत्वावर आणि पुढील काळात त्यांच्या साहित्यावर काही अंशी परिणाम नक्कीच झाला. ते पाश्चात्य संगीत शिकले. इंग्लंडमध्ये असताना ते स्कॉट कुटुंबात राहिले होते. त्या कुटुंबातील मिसेस स्कॉट या अत्यंत प्रेमळ होत्या. त्यांनी रवींद्रनाथांवर आईसारखी माया केली. त्यांची आपल्या कुटुंबाप्रती असलेली निष्ठा, मुलींवर आणि आपल्या पतीवर असलेलं प्रेम पाहून रवींद्रनाथांना स्त्री मधील प्रेमभावना सर्वत्र सारख्याच आणि वैश्विक असतात याची खात्री पटली. त्याच कुटुंबात असताना पाश्चात्य संगीताशी देखील त्यांचा संबंध आला. त्या काळात शेक्सपिअर, मिल्टन, बायरन आदी साहित्यिक म्हणजे साहित्य रसिकांसाठी दैवतेच होती. त्यांच्याही साहित्यकृतींचा अभ्यास रवींद्रनाथांनी केला. परंतु इंग्लंडमधील औपचारिक शिक्षणात फारशी रुची नसल्याने ते भारतात परत आले.

भारतात परत आल्यावर त्यांनी वाल्मिकी प्रतिभा या नावाचे एक नाटक लिहिले. या वेळी त्यांचे वय अवघे वीस वर्षांचे होते. रवींद्रनाथांना नाट्य, संगीत आणि काव्यलेखनाचे बाळकडू त्यांच्या घरातच अगदी लहानपणापासून मिळाले होते. त्यांचे भाऊ ज्योतिरिंद्रनाथ नाटके लिहीत आणि बसवत असत. गुणिंद्रनाथ म्हणून त्यांच्या एका चुलतभावाला पण नाटकांची आवड होती. ज्योतिदांनी रवींद्रनाथांना नेहमीच उत्तेजन दिले. त्यामुळे रवींद्रनाथांची प्रतिभा साहित्यक्षेत्रात मुक्तपणे संचार करू लागली होती.

वाल्मिकी प्रतिभा हे नाटक अनेक अर्थांनी आगळेवेगळे आहे. वाल्या कोळी वाल्मिकी ऋषी होण्याआधी एक दरोडेखोर होता हे आपल्या सगळ्यांना माहिती आहे. ब्रह्मदेव आणि नारदांच्या आज्ञेनुसार त्यांनी रामायणाची रचना केली. परंतु ही रचना करण्याआधी त्यांनी क्रौंच पक्षाचे एक जोडपे एका झाडावर बसलेले पाहिले. त्या आपल्या आनंदात निमग्न असणाऱ्या एका पक्ष्याला एका शिकाऱ्याने बाण मारला. त्यामुळे त्या दुसऱ्या पक्ष्याचा विलाप पाहून वाल्मिकींचे हृदय द्रवले आणि त्यांच्या तोंडून रामायणातील तो प्रसिद्ध श्लोक बाहेर पडला.

मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः ।
यत्क्रौंचमिथुनादेकमवधी काममोहितम् ।।

कधी नव्हे तो आपल्या तोंडून अशा प्रकारची सुंदर रचना कशी काय बाहेर पडली याचे त्यांना नवल वाटले. त्यानंतर त्यांनी ब्रम्हदेव आणि नारदांच्या आशीर्वादाने रामायणाची रचना केली हे आपल्या सगळ्यांना माहिती आहे. ही जी मूळ घटना आहे, ती रवींद्रनाथांना मान्य होती. पण आपल्या नाटकात त्या घटनेला त्यांनी वेगळीच कलाटणी दिली.

त्यांच्या वाल्मिकी प्रतिभा या नाटकात वाल्या आणि त्याचे साथीदार यांची दरोडेखोरांची एक टोळी असते. ही सगळी मंडळी अत्यंत क्रूर आणि आडदांड असतात. ते प्रतिभा नावाच्या एका निरागस मुलीला पकडून आणतात आणि कालीमातेपुढे तिचा बळी देण्याचं ठरवतात. या निष्पाप मुलीचा आक्रोश ऐकून वाल्याचे हृदय द्रवते. तो आपल्या साथीदारांशी वैर पत्करून तिची सुटका करतो. टोळीतील सहकाऱ्यांना सोडून देऊन तिला घेऊन रानोमाळ भटकतो. त्यातूनच त्याचे हृदयपरिवर्तन होते. तो स्वतः विषयी विचार करू लागतो. अंतरात्म्याचा शोध घेतो. त्याची ही तळमळ पाहून ती मुलगी म्हणजे प्रतिभा आपल्या खऱ्या रूपात त्याच्यासमोर प्रकट होते.

# डॉ. मीना प्रभू : सशक्त प्रवासवर्णनकार लेखिका

ज्योतिर्मय साहित्य

मराठी साहित्यात प्रवासवर्णन म्हटले की ज्यांचे नाव सर्वप्रथम घ्यावेसे वाटते त्या ज्येष्ठ लेखिका, डॉ. मीना प्रभू या अखेर १ मार्च २०२५ रोजी आपल्या अनन्ताच्या प्रवासाला निघून गेल्या आहेत. त्या ८५ वर्षांच्या होत्या. माझं लंडन, दक्षिणरंग, मेक्सिकोपर्व, चीनी माती , ग्रीकान्जली, इजिप्तायन, तुर्कनामा, गाथा इराणी, रोमराज्य, वाट तिबेटची, अपूर्वरंग, न्यूयॉर्क- न्यूयॉर्क ही त्यांची पुस्तके प्रचंड गाजली. मराठी साहित्यात प्रवासवर्णन या लेखनप्रकाराला प्रतिष्ठा आणि सन्मान मिळवून देण्यास त्यांची हीच पुस्तके कारणीभूत ठरली. लेडी डायना हिच्या जीवनावर त्यांनी " मुखवट्याआडचे चेहरे " या शीर्षकाची एक दीर्घकथासुद्धा लिहिली होती. त्यांचा जन्म २७ ऑगस्ट १९३९ रोजी पुण्याजवळच्या खडकी येथील एका नाईक परिवारात झाला होता. पुण्यातूनच बी. जे. मेडिकल कॉलेजमधून त्या एम. बी. बी. एस. झाल्या. त्यानंतर त्यांनी मुंबई विद्यापीठातून भूल तंत्र ( ॲनस्थेशिया ) या विषयात एम डी केले. मुंबईतले ख्यातनाम वास्तुविशारद आणि बांधकाम उद्योजक शशी प्रभू यांचे ज्येष्ठ बंधु, जे इंग्लंडमधले एक अग्रगण्य वास्तुशिल्पकार आणि बांधकाम व्यावसायिक होते, अश्या श्री. सुधाकर श्रीरंग प्रभू यांच्याशी त्यांचा विवाह झाला. आजच्या घडीला सेंट्रल लंडनमध्ये जे हॉटेल हिल्टन मेट्रोपोल उभे आहे त्याच्या उभारणीत सुधाकर प्रभू यांचा सिंहाचा वाटा आहे, तसेच नॅशनल वेस्टमिन्स्टर बँकेची ४२ मजल्यांची जी इमारत दिसते, तिच्या निर्मितीचे श्रेय पेल फ्रिशमन या ब्रिटिश कंपनीचे प्रमुख कार्यकारी अधिकारी या नात्याने श्री.



सुधाकर प्रभू यांच्याकडेच जाते. सुधाकर हे मूळचे कोकणचे रहिवासी होते आणि कुडाळ देशकर आद्य गौड समाजात एक सुविद्य, सुसंस्कृत आणि सधन व्यक्ती म्हणून सुपरिचित होते. मुंबईतल्या व्ही, जे. टी. आय. मधून त्यांनी स्ट्रक्चरल

प्रवीण कारखानीस
९८६०६४९१२७

इंजिनिअरिंग या विषयात पदवी प्राप्त केलेली होती. त्यांच्याशी विवाहबद्ध झाल्यानंतर डॉ. मीना प्रभू या इंग्लंडमध्येच स्थायिक झाल्या. तिथे त्यांनी भूल तज्ज्ञ म्हणून कामही केले आणि ब्रिटिश पौण्डात अर्थार्जनही केले. ब्रिटिश पासपोर्टधारकांना बहुतेक सर्वच देशांचा व्हिसा हा त्या त्या देशात पोहोचताच विनासायास मिळतो हे लक्षात घेऊन त्यांनी विविध देशात प्रचंड प्रवास केला आणि त्यांची विस्तृत प्रवासवर्णने लिहिली. कधीमधी त्या मुबईत प्रभादेवी येथे तर कधी पुण्यात येऊन राहत असत. अलीकडची अनेक वर्षे त्यांचे वास्तव्य पुण्यातच होते. तुषार आणि आशुतोष हे त्यांचे पुत्रद्वय आहेत आणि वर्षा ( ॲडव्होकेट रेवती काळे ) ही त्यांची सुकन्या आहे. डॉ. मीना प्रभू यांचे पती २३ जुलै २०२३ रोजी इंग्लंडमध्ये निधन पावले. डॉ. मीना प्रभू यांना दि. बा मोकाशी पुरस्कार, मृण्मयी पुरस्कार, नरसिंह चिंतामण केळकर पुरस्कार प्राप्त झाले होते. पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेने जीवन गौरव पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले होते. अलीकडेच अमळनेर येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात त्यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम जाहीर झाला होता. माझे स्नेही गिरीश चौक हे ती मुलाखत घेणार होते. डॉ. मीना प्रभू या त्यांची प्रकृती अजिबात ठीक नसतानाही पुणे ते अमळनेर हा आडवळणाचा, दीर्घ आणि खडतर प्रवास करून योग्य वेळी संमेलनस्थळी दाखल देखील झाल्या होत्या. माझ्यासारखे शेकडो प्रतिनिधि आणि साहित्यप्रेमी हे डॉ. प्रभू यांची मुलाखत ऐकण्यासाठी आतुर झालेले असताना संयोजकांनी एकाएकी सदर मुलाखतीचा कार्यक्रम वेळे अभावी रद्दच करून आम्हां सर्वांची घोर निराशा केली होती. असो. दूरदूरच्या देशांतून बेडरपणे प्रवास करून मिळवलेले आपले ज्ञान संचित मराठी वाचकांना सढळपणे उपलब्ध करून देणाऱ्या सशक्त लेखिका डॉ. मीना प्रभू यांच्या स्मृतीस माझे विनम्र अभिवादन !

****




# लॉक डाउन

ज्योतिर्मय साहित्य

सकाळी उठून पोळी-भाजी केली टिफिन भरला नवऱ्याला उडवलं की पूर्ण दिवस अगदी मनाजोगता घालवायला आपण मोकळे.

आता जवळ जवळ दहा दिवस झाले लॉकडाऊनला सकाळी उठून शिस्तीत नाश्ता होतो. परत दोन तासांनी जेवण. काही करायला घ्यावं म्हटलं तर पुन्हा उठणे चहाची वेळ झाली. एकपाठी लिखाणाला वेळच मिळेनासा झाला होता म्हणून चिडून तोंडातून निघून गेलं घरी आहात तर निदान चहा तरी.....

आणि स्वारीनी मनावर घेऊन चहा करायला घेतला पाण्याला आधण आल्यावर म्हटलं चहापूड व साखर टाका. सांगितल्याप्रमाणे केले नंतर घाबरून......अगं चहा असा खदखदतोय. जरा बघ ये. बघते तो काय स्वारीनी साखर म्हणून तांदूळ कणी टाकली. वाटलं उगाच भरीस पाडलं. भांड खराब दोन चमचे कणी, चहापूड, गॅस फुकट गेलं सगळे व दुहेरी मेहेनत.



श्रीमती कल्पना दिलीप मापूसकर
मीरा रोड
९०८२६ ४६४९४

आता स्वारीनी बहुतेक मनावरचं घेतलं. सकाळी मी उठायच्या आधी चहा करायला घेतला. चहा केलाही बाजूला दूध गरम करायला ठेवले. अगं उठ चहा केलाय. दूध गरम करायला ठेवलंय पण ते खदखदतय. काय हो काल चहा आज दुध .... सगळंच कसं तुमचं खदखदतं.....? उठून पहाते तर काय ....दूध म्हणून स्वारीनी इडलीचं पीठ गॅसवर तापवायला ठेवलं होतं. माझ्या तोंडून निघालं.

"देवा..... केंवा हा विषाणू जायचा" मी करोना ला म्हटलं स्वारी अजून भांडत आहे की मलाच बोललीस म्हणून .....




# पर्यावरणाची शिकवण देणारे खारुताईचे जंगल

ज्योतिर्मय साहित्य

खारुताईचे जंगल ही खारुताईने फळ खाऊन बिया जमिनीत पुरुन ठेवल्या त्या बियांतून पावसाळ्यात नवीन झाडे उगवली. तोच आदर्श मुलांनी घ्यायला हवा, ते नवीन जंगल तोडू देण्यास माणसांनी खारुताईचे जंगल असा फलक लावून ते जंगल वाचविले आणि त्या जंगलाचे जतन संवर्धन केले. प्राणी आणि माणसांनी मिळून जंगल वाचवायला हवे, त्यातील प्राण्यांना अभय हवे असा संदेश ही कथा देते.

आजी आणि चिमणी, ही कथा महापुराची आहे. महाप्रलयान त्रासलेली चिमणी. तिच्या घरट्याची वाताहत झाली होती. ममता आजीच्या घरीही पुराने थैमान घातलेले होते. घरातील धान्य भिजून खराब झाले होते. तिच्या नातवानं विचारलं हे भिजलेले गहू उकिरड्यावर फेकून देऊ का? त्यावर ममता आजीने म्हटले हे गहू वाळवून पाखरांना खाऊ घालू. आपल्या आपत्तीत देखील आपण दुसऱ्या जिवांचा विचार करायला हवा ही शिकवण देते.

कॉल केला की हजर, ही कथा स्वप्नाच्या दुनियेत नेते. मांजरांच्या भांडणाने रामू दचकला पण फोन केला की पोलीस हजर होतो. पण बॅटरी डिस्चार्ज झाल्याने फोनमधील पोलीस मदतीला येऊ शकत नाहीत. तेव्हा आईने त्याला उठवले त्याच वेळी मांजरींना हाकलून दिले. ही कथा मोबाईलच्या आहारी न जाता माणसाने माणसासाठी वावरणाऱ्या आईची आहे.

दोन चिमण्या, ही कथा स्वावलंबी होण्यास शिकवते. जंगलातील दोन चिमण्या. त्यातील एक शहरात जाते फ्लॅटमध्ये घरटे बांधते सोसायटीत व घरात तिला व तिच्या पिलांना आयते खायला मिळते परंतु ती एक प्रकारची कैदच असते की. जंगलातील चिमणीला ते आवडत नाही. दोघी भेटतात आणि गप्पा मारतात. एक दिवस रिंका चिमणी रिंकीच्या घरी जंगलात जाते, पिल्लांसह. जंगलच्या थंडीमुळे आजारी पडते दोन दिवस राहून शहरात परत जाते. स्वतः शोधून अन्न खाण्यातला आनंद ती विसरलेली असते. आयते खाऊन मठ्ठ झालेली असते. स्वावलंबनाचा मंत्र ही कथा देते.

जादूगारीची फजिती, ही कथा जादूची गंमत सांगते. जादूगारालाही फसवणाऱ्या मुलांची ही कथा. जादूचा रुमाल कसा गायब होतो ही चलाखीची कथा आहे.

आभाळाची फुले ही कथा एका फुलाची. ढग म्हणजे आभाळाची फुलेच ना. तिने लावलेल्या वेलीला फूल आलेले असते पावसाची आणि ढगांची ही कथा आहे.

पुस्तक परीक्षण
डॉ.प्रकाश रामचंद्र क्षीरसागर
९०११०८२२९९

माणसाची मुक्तता ही कथा जंलात आलेल्या माणसाला अद्दल घडवू पाहणाऱ्या माणसालाच कशी अद्दल घडली आणि शेवटी तो जंगलातून पळून कसा गेला ही नाट्यमय कथा आहे. माणूस पशु पक्षांना ठार करतो परंतु प्राणी मात्र माणसाला जिवंत जंगलाबाहेर हाकलतात. अशी ही भावनाप्रधान कथा.

मोहीम फत्ते ही एका साहसी मुलाची कथा आहे. चतुर अरुण एक ढोंगी बाबाला शिताफीने पकडून पोलिसांच्या स्वाधीन करतो व गावाला मुक्त करतो. हा बाबा लोकांना वेदनशामक औषधे देत होता, हा त्याचा डाव अरुणने ओळखून त्याला पोलिसांच्या हवाली केले. मुलांनी वैज्ञानिक ज्ञानाचा उपयोग आपल्या गावासाठी कसा करावा हे ही कथा सांगते.

कापसाची पोर ही कथा मुले कष्ट करून कापूस वेचून वडिलांना कपडे घेऊन देतात ही कथा आहे. स्वतःच्या कपड्यासाठी साठवलेले पैसे ते मुलांना सहलीसाठी देतात. ही मुले आपल्या आई वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून स्वतः कापूस वेचून पैसे कमावतात व वडिलांना देतात.ही कथा आईवडीलाच्या कष्टाची जाणीव ठेवावी ही शिकवण देते.

पहिल्या भाषणाचे बक्षीस ही कथा आपण थोरांच्या शिकवणीचे पालन करावे म्हणजे भविष्यात आपणही मोठे वक्ते होऊ शकू. पहिलीत केलेल्या भाषणाची फलश्रुती भविष्यात त्याच शाळेत तो वक्ता म्हणून येतो. आत्मविश्वास वाढविणारी ही कथा.

एकंदर साऱ्याच कथा काही ना काही शिकवण देणाऱ्या आहेत.

खारुताईचे जंगल
डॉ. कैलास दौंड
पृष्ठे ४७, मूल्य १०० रुपये




प्रकाशक घनश्याम पाटील
चपराक प्रकाशन, पुणे २१

# जंगलतोड व वाढत्या प्रदुषणामुळे वन्यजीव धोक्याच्या उंबरठ्यावर

ज्योतिर्मय साहित्य

वन्यजीव वाचविण्यासाठी पृथ्वीचे व निसर्ग सृष्टीचे रक्षण आवश्यक. २० डिसेंबर २०१३ रोजी, संयुक्त राष्ट्र महासभेच्या ६८ व्या अधिवेशनात, दरवर्षी ३ मार्च रोजी जागतिक वन्यजीव दिन साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. परंतु खरंतर, ३ मार्च १९७३ रोजी, वन्य प्राणी आणि वनस्पतींच्या लुप्तप्राय प्रजातींच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावरील अधिवेशन (सीआयटीईएस) सुरु झाले होते. त्यावेळेस जगातिल जंगलातील प्राणी आणि वनस्पती याबद्दल जागरूकता वाढविण्यासाठी थायलंडने प्रस्तावित केले होते.परंतु २० डिसेंबर २०१३ ला प्राण्यांच्या रक्षणासाठी अधिकृतपणे दरवर्षी ३ मार्चला ''जागतिक वन्यजीव दिवस'' साजरा करण्याचे जाहीर झाले तेव्हा पासून ३ मार्च जागतिक वन्यजीव दिवस साजरा करण्यात येतो.या मागचा उद्देश म्हणजे जंगलातील प्राण्यांचे संरक्षण करण्यासाठी कोणकोणते उपाय योजले जाऊ शकतात यासाठी दरवर्षी जागतिक वन्यजीव दिवस साजरा करण्यात येतो. पृथ्वीचा दीवसेंदीवस ह्रास होत आहे. यामुळे ऑक्सिजनची मात्रा कमी होत असुन जंगलातील प्राणीमात्रांवर व वनस्पतीवर विपरीत परिणाम होतांना दिसतो. यासाठी पृथ्वीला वाचवण्यासाठी सर्वांनी ''संकल्प'' करण्याची गरज आहे.कारण पृथ्वीवरील संपूर्ण जीवसृष्टीचे रक्षण व्हायलाच हवे.सध्याच्या परीस्थितीत जगातील वाढती लोकसंख्या पृथ्वीतलावरील मोठे संकट आहे.यामुळे हवेतील ऑक्सिजनची मात्रा कमी होतांना दिसुन येते.कारण जगातील वाढत्या लोकसंख्येमुळे जंगलसंपदा छिन्न-विछिन्न झाल्याचे दीसुन येते.त्याचप्रमाणे अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मोठ्या प्रमाणात कारखाने दीसुन येतात.यामुळे संपूर्ण जगात स्थलप्रदुषण,वायुप्रदूषण व जलप्रदूषण मोठ्या प्रमाणात होतांना दिसते.कारखाण्याचा विस्तार जगातील सर्वच देशांनी वाढविला आहे.यामुळे पहीला प्रहार जंगलसंपत्तीवर झालेला दिसुन येतो. यामुळे वन्यजीव व वनस्पती धोक्याच्या उंबरठ्यावर दिसुन येते.याच कारणामुळे आज पृथ्वीचे संतुलन डगमगतांना दीसुन येते.मानवाच्या अतिरेकामुळे पृथ्वीतलावरील भुकंप, ज्वालामुखीचा उद्रेक,सुनामी, महाप्रलय,महामारी,साथीचे रोग,अती पाउस,अती उष्णता,अती थंडी,समुद्राची पातळी वाढणे अशाप्रकारचे विनाशाकडे नेणाऱ्या घटना दीवसेंदीवस वाढतांना दीसत आहे व याचा परिणाम सर्वांनाच भोगावा लागतो आहे.याचे मुख्य कारण म्हणजे जंगल संपदा नष्ट होने ह्या संपूर्ण घटना मानवाने पृथ्वीवर अत्याचार केल्यामुळे दीसुन येतात.याचे प्रायश्चित्त वन्यजीव व प्राण्यांसोबत संपूर्ण जीवसृष्टीला भोगावे लागत आहे. २१ व्या शतकात मानव इतका सामोरं गेला आहे की अनेक टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून अत्याधुनिक हतियार बनविण्याच्या शर्यती लागलेला आहेत.आतातर ''बायोवेपन्स'' म्हणजे जैविक हतीयार बनविण्याची शर्यत लागली आहे.यामुळे पृथ्वी ''तहस-नहस'' होवू शकते आणि याचा पहिला प्रहार जंगलसंपदावर होतांना दिसतो.आज मानवाने जंगल संपत्तीची हत्या केल्यामुळे नदी-नाले,तलाव, विहिरी मोठ्या प्रमाणात आटलेले दीसतात.यामुळे जंगलातील प्राणीमात्रांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे.याकरीता जगातील संपूर्ण देशांनी प्राण्यांसाठी पाणवठ्याची व्यवस्था करणे गरजेचे आहे.त्याचप्रमाणे पृथ्वीच्या तापमानात दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढ होतांना दिसते आणि ग्लोबल वॉर्मिंगमुळे सुध्दा पृथ्वीचे संतुलन डगमगायला लागले आहे. पृथ्वीवरील जंगलसंपदा कमी झाल्यामुळे व छोटे-मोठे तलाव आटल्यामुळे हिंसक पशु व जंगलातील इतर पशू (वाघ, बिबट्या, अस्वल, हरीण,बंदर) यांना जंगलात योग्य आहार व पाणी मिळत नसल्यामुळे शहराकडे धाव घेतांना दीसतात हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे यावर जागतिक पातळीवर अभ्यास व्हायला हवा.अशा अनेक कारणांमुळे पृथ्वीचा ह्रास होत आहे व जंगली प्राण्यांचा जिवन धोक्यात आलेले आहे.यावर उपाय शोधण्यासाठी जागतिक स्तरावर अनेक योजना राबविल्या जातात.आज जगात २०० हुन अधिक देश आहेत या देशांच्या तुलनेत लोकसंख्येचा विचार केला तर १००० कोटींच्या वर लोकसंख्या आहे.त्यामुळे संपूर्ण देशांनी पृथ्वीला वाचविण्याच्या उद्देशाने जागतिक वन्यजीव दिवसाच्या निमित्ताने प्रत्येक व्यक्तीने एकतरी झाड लावायला पाहिजे. कारण नैसर्गिक ऑक्सिजन टिकवून ठेवण्यासाठी जंगल वाचवीले पाहिजे, वृक्षारोपण केले पाहिजे आणि पृथ्वीला वाचविले पाहिजे.त्याचप्रमाणे जंगल तोडीमुळे जंगलातील प्राणी शहराकडे भटकतात त्यांच्यासाठी जगातील संपूर्ण देशांनी जंगलामध्ये छोटे-छोटे तलाव बांधुन जंगली प्राण्यांचे प्राण वाचवुन संगोपन करायला पाहिजे. कारण मानवाच्या अनेक चुकांमुळे अनेक जंगली पशु-पक्षी व महत्त्वपूर्ण औषधीयुक्त वृक्ष लुप्त होत आहे.या पृथ्वीतलावर प्रत्येक प्राण्याचे व वृक्षांचे असने आवश्यक आहे.कारण प्रत्येक पशु-पक्षी एकमेकांवर अवलंबून असतो त्याचप्रमाणे प्रत्येक वृक्ष महत्वाची भुमिका बजावीत असते. जगातील ''गिधाड'' हा पक्षी अत्यंत महत्त्वाची भुमिका बजावीत असतो.मेलेल्या प्राण्यांचे मांस खाणे ''गिधाड''चे काम असते.त्यामुळे तेथील परीसर शुद्ध होतो.परंतु दु:खाची बाब ही की वायुप्रदूषण व जलप्रदूषण यामुळे गिधाडांची संख्या दिवसेंदिवस घटत आहे. त्यामुळे पृथ्वीवर मानवजातीचे असने जेवढे महत्त्वाचे तेवढेच जंगलातील पशु-पक्षी व वनस्पती यांचे सुध्दा जिवन तेवढेच महत्वाचे आहे.तेव्हाच पृथ्वी सुरक्षीत राहील. मानवजातीने स्वत:च्या स्वार्थापोटी ''पृथ्वीची राखरांगोळी'' केली आहे.याचे पुढे चालुन महाभयानक परीणाम सर्वांनाच भोगावे लागतील आणि याचे परिणाम आपण करोना महामारीच्या रूपात भोगलेही आहे.आज मानवजातीने पुर्वे पासुन तर पश्चिम पर्यंत उत्तर पासुन तर दक्षिणे पर्यंत,आकाश-पाताळा या संपूर्ण ठीकाणी मोठ्या प्रमाणात प्रदुषणाचे जाळे पसरविले आहे.यामुळे आज ''पृथ्वी माता'' सुध्दा भयभीत आहे म्हणूनच आज आपल्याला कृत्रिम ऑक्सिजनची गरज भासत आहे.याला वाचविण्याचे दायीत्व मानवाने स्वीकारले पाहिजे.आज मानवाची रक्षा करण्याकरीता पृथ्वीला वाचविण्याचा ''संकल्प''जगातील संपूर्ण राष्ट्रांनी घ्यायला पाहिजे.आज वृक्षलागवडच पृथ्वीला वाचवु शकते.कारण आज जगात जंगलांचे संगोपन होत नसल्याने मोठ्या प्रमाणात वनवे लागतांना दिसतात व यामुळे मोठ्या प्रमाणात जंगल संपदा नष्ट होते व प्राणीमात्रांना आपले प्राण गमवावे लागते. त्याचप्रमाणे देशात व जगात दिवसेंदिवस आगीच्या सुध्दा घटना मोठ्या प्रमाणात वाढत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे वाढते तापमान व यामुळे पृथ्वीचे संतुलन डगमगत आहे हे नक्की.याला कुठेतरी थांबायला पाहिजे. वृक्ष लागवडीमुळे पावसाचे पाणी जमीनीमध्ये मुरेल व पावसाचे पाणी सरळ समुद्र किंवा नद्यामध्ये न जाता पृथ्वीच्या पोटात जाईल.यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढण्यास मोठी मदत मिळेल व उष्णतेचे प्रमाण कमी होईल.यामुळे विहिरी,तलाव व नदी नेहमी जलमग्न राहील.आज मानवाने पाण्यासाठी सरळ पाताळात प्रवेश केला आहे.म्हणजेच आज मानवाने पाण्यासाठी जमिच्या आत ७०० फुट खोलवर जाऊन बोरवेलच्या सहाय्याने आपण देवलोकातील(पाताळातील) पाणी शोषीत आहोत.मानवाची जमीनीतील पाण्याची क्षमता फक्त ५० फुटांपर्यंत आहे.परंतु मानवाचा अतिरेक हा विध्वंसाकडे किंवा विनाशाकडे न्यायला काहीच वेळ लागणार नाही.कारण मानवाच्या हातात सर्वच काही आहे.परंतु मानवाने अजुन पर्यंत निसर्गावर नियंत्रण ठेवता आले नाही.नैसर्गिक आपदासमोर मानव नेहमी हतबल होतांना दिसतो.वनवा लागले, महाप्रलय येणे,हीमकडा कोसळने, उष्णतामान वाढने,भुकंप येणे,सुनामी येणे ह्या संपूर्ण गोष्टी मानवाने स्वत:हुन ओढवलेल्या आहेत.यामुळे जगात दरवर्षी मोठ्या प्रमाणात जिवीत हाणी व वित्तीय हानी होतांना आपण पहातो. पृथ्वी मानवजाती के लिये मेहमान है, मालक नहीं'' ही बाब मानवांनी लक्षात ठेवली पाहिजे व पृथ्वीचे रक्षण करून संपूर्ण जीवसृष्टीला वाचवण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न व्हायला पाहिजे.वन्यजीव दिनाच्या निमितत्ताने मी सर्वांना आग्रह करतो की नैसर्गिक ऑक्सिजन, प्राणीमात्रांना चारा, प्राण्यांचे संरक्षण यासाठी जंगल तोड थांबवा व मोठ्या प्रमाणात वृक्षलागवडीवर भर द्या.यामुळे ''गुरांना चारा व सर्वांना शुद्ध हवा आणि शुद्ध ऑक्सिजन'' मिळेल. ***

रमेश कृष्णराव लांजेवार
(माजि विद्यापिठ प्रतिनिधी
नागपूर)

# शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षणासाठी पाचदिवसीय प्रशिक्षण संपन्न

ज्योतिर्मय साहित्य

**पंढरपूर** - सामाजिक व भावनिक शैक्षणिक दर्जा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गरजाही खूप प्रमाणात वाढल्या आहेत आहेत त्याच पद्धतीने मुलांची क्षमता वाढवण्याच्या दृष्टिकोनातून शिक्षणामध्ये आमूलाग्र बदल होने गरजेचे आहे यासाठी राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत येतील राहुल गांधी माध्यमिक विद्यालय कोर्टी तालुका पंढरपूर येथे पाच दिवसीय प्राथमिक शिक्षकाचे प्रशिक्षण सोमवार ते शनिवार पार पडणार आहे जिल्हा परिषद खाजगी अनुदानित आश्रम शाळेतील शिक्षकांसाठी हे प्रशिक्षण २५ फेब्रुवारी ते एक मार्च २०२५ पाच दिवसाचा तिसरा टप्पा याप्रमाणे एकूण सहा टप्प्यात पूर्ण झाले. वर्षातून सर्व शाळेतील शिक्षकाचे एका वेळेस ५० तासाचे प्रशिक्षण होणे आवश्यक आहे. आयोजन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वेळापुर प्राचार्य जितेंद्र साळुंखे, शिक्षणाधिकारी कादर शेख, माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप, गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे, समन्वयक अधिव्याख्याता सुलभा पुजारी संजय बरमदे, विक्रम जाधव आपा तौर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण झाले. प्रशिक्षणामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० राज्य शैक्षणिक आराखडा २०२४, बदललेली मूल्यांकन पद्धती, समग्र प्रगती पत्र प्रश्न निर्मिती कौशल्य, माहिती तंत्रज्ञान, विद्यार्थी क्षमता अध्ययन निष्पत्ती कौशल्य यांचे सखोल मार्गदर्शन प्रशिक्षणात सुलभक गुणसंतोष फड, सुनिल पुरी, बाबासाहेब दराडे , प्रविण राठोड, दत्तात्रय रोंग, संजय हेगडे, दिपक माने,आशा क्षीरसागर यांनी अनमोल मार्गदर्शन केले. ****








## माय मराठी

माय मराठी आमची
आम्ही तिची लेकरे
मराठी भाषा अस्मिता
रोमांत आमच्या भरे

जागवी मराठी बाणा
शब्द भांडारातून ह्दय
करी प्रत्येक लेकरास
सुजाण, जागृत, सुविद्य

संतांनी गायली महती
अभंग मराठी रचून
पूजले मातेसम सदा
कवींनी कवणे अर्पूण

मन आकाश दुमदुमते
वाचून मराठी साहित्य
जीवनास नवदिशा लाभते
जाणून मराठी साहित्य

अलंकारांनी मराठीस मढवून
सारस्वतांनी केले अलंकृत
मनामनात अढळता राखून
जनाजनात मराठी अंगीकृत

अंतरीगगन भेदते मराठी
भिनवून अंगात ऊर्जा
लाभली मराठीस संजीवनी
मिळाला अभिजात दर्जा

मिळाली जेव्हा अभिजातता
तेजोमय झाल्या दिशा सर्व
कणकण मराठी मातीचा
अनुभवतोय असीम गर्व

**- मनोज शोभाबाई प्रकाश अग्रवाल,**
छत्रपती संभाजीनगर.




## गीत,भोलेनाथ

(रस, भक्ती रस)

सभी देवोके देव तुम नाथा
स्वामी कार्तिकेय के तुम पिता
विघ्नराज की तुम माता
आदी देव शंकर की पार्वती माता ।। धृ।।

सर्वव्यापी तुम हो सर्वेश्वर
कल्याणकर्ता तुम उमा महेश्वर ।
सारा जिवन गुजरे आपसे होकर
आप तो कणकण मे हो शिव शंकर।।
तूम सबसे पहले पुजा जाता
तुम तो सारे जगत के हो दाता १

देव देवेश्वर सर्वज्ञ हो तुम
तुम तो सबके तारणहार ।
बम्हा विष्णु को तुम्हीमे देखा
तुम तो सबके पालनहार ।।
हे त्रिशुल धारी नाथा
तुम तो हमारे माता पिता ।।२।।

सर्वान्तरयामी सर्वस्वरूप रूपवाले
बंबबंब भोले बाबा अब तो आजा
सभी सुख भोगो का तू है दाता
तुम्हे तो हमने कणकण मे पुजा ।।
सभी सुरत मुरत के तूम हो दाता
तुम सभी देवो के हो देवता ।।३।।

**जगन्नाथ जाधव, एसगाव**
खुलताबाद. ९६७३१५०७०५

## गौरव मराठीचा

सरस्वतीला करुनि वंदन
कुसुमाग्रजांचे करुनि स्मरण
शब्दसाधना करुनि निरंतर
काव्यनिर्मिती करती कविवर

कवि होऊनि मराठीचा
रचना करती हे ज्ञानेश्वर
शिक्षा भोगली अंदमानात
काव्य रचिती ते सावरकर

भूमि असे ही महाराष्ट्राची
माय मराठी भाषा सर्वांची
इथे जन्मले महाराज शिवाजी
त्यांनी केली सेवा राष्ट्र धर्माची

समर्थ होते गुरु तयांचे
समर्थ केले शिवरायांना
मातृभूमिचे रक्षण केले
राजाश्रय दिला मातृभाषेला

त्या मराठीचे जतन करण्या
मराठीचा ध्वज सर्वत्र फिरविण्या
साहित्याचे निर्माण करण्या
प्रथम होऊ साहित्य रसिक.

**- श्रीपाद अनंत दसरे**
**छत्रपती संभाजीनगर**

## जय माय मराठी

क - क्लेश नको,
ख - खोट नको,
ग - गर्व नको,
घ - घमंड नको,
माय मराठी शिकवते, निर्मळ जगणं!
च - चिंता नको,
छ - छळ नको,
ज - जळणं नको,
झ - झुरणं नको,
माय शिकवते जीवन, आनंदाने भरलेलं!
ट - टीका नको,
ठ - ठकवणं नको,
ड - डरणं नको,
ढ - ढोंग नको,
माय सांगते सत्य, जगू निर्मळ मनानं!
त - तंदुरुस्त जिणं,
थ - थकून न जाणं,
द - दिलदार वागणं,
ध - धोका न देणं,
माय शिकवते प्रेम, माणुसकी जपणं!
न - नम्र राहणं,
प - पाप न करणं,
फ - फसवेगिरी नसणं,
ब - बालिश न होणं,
माय शिकवते नीती, चांगुलपणं राखणं!
भ - भावना जपू,
म - मधुरवाणी ठेऊ,
य - यशवंत बनू,
र - रडगाणं न गाऊ,
माय शिकवते श्रम, पुढे जायला शिकू!
ल - लालच न ठेवू,
व - वैरभाव न ठेवू,
श - शत्रुत्व न मानू,
ष - षड्यंत्र न रचू,
माय शिकवते सहकार्य, मनाने जोडू!
स - सत्य सांगू,
ह - हसतमुख राहू,
क्ष - क्षमाशील बनू,
त्र - त्रास न देऊ,
माय शिकवते करुणा, सर्वांना सुख देऊ!
ज्ञ - ज्ञानदीप उजळू,
ज्ञानाचा वारसा ठेवू,
माय मराठी शिकवते,
स्नेहाने जगू, तेजाने झळकू!

**- प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर**
( छत्रपती संभाजीनगर)

## इप्सित जन्माचे

सखये! बहरते तुझे प्रेम
आनंदे बहरते माझेही प्रेम
तुझ्या माझ्या श्वासाश्वासांतूनी
सखये! विहरते आपुले प्रेम
गंधाळलेली स्वप्नफुले ती
फुलवूत जीवनी आपुल्या
नव्या क्षितीजाच्या नव्या दिशा
फुलवूत जीवनी अवघ्या आशा
मन हे मोग-यासम असावे
निज जीवनी सुगंधी असावे
चांदण्यात या जीवनाच्या
स्वत:ला नाहवून घ्यावे
सखे! आत्मरंगी जो रंगतो
सूख आत्मज्ञानाचे पाहतो
तोच अंतर्बाह्य इश्वराला भावतो
अन् ईप्सित जन्माचे साधतो

**-मधुकर ए. निलेगावकर, पुणे**

## नाव....

इथे जन्म झाला इथे गाव आहे
तुम्ही ठेवलेले मला नाव आहे
चोरून नजरा अता भेटलो मी
किती जन्म गेले कुणा ठाव आहे
जरी जाणले मी वशीले तयांचे
तरी पाहतो मी मला वाव आहे
स्मरे नाव ओठावरी ते न माझे
डोळ्यातूनी वाहतो भाव आहे
स्वये टांगती तेच नीती खुटीला
कुणी थोर येथे कुणी साव आहे
दिसे ना जरी ते ठसे पावलांचे
वाटेवरी त्या पुन्हा धाव आहे
तरी गाठला कष्टदायी किनारा
भवऱ्यातूनी ही जरी नाव आहे

**- बलराज संघई**
९४२००१५१०८
छत्रपती संभाजीनगर

## बाळराजा...

रात्रीच्या मिट्ट काळोखात
चांदण्या जमल्या स्वागतास ,
आईच्या कुशीत देखणा
चंद्रची आला जन्मास !
जग सारे निजले होते,
सगळी कडे शुकशुकाट !
बाळोबांचे नातलग परी,
बसले होते पाहत वाट!
गोजिरवाण्या रुपाने घरी
आले सुखं चालते बोलते ,
हसत खेळत जातो दिस
रात्र ही जागरणात सरते!
पाहता पाहता गेले मास
वरिस ही झाले क्षणात,
तान्हुलं माझं कुशीतून,
धावु लागलं अंगणात!
आई बाबा झालो आम्ही
देवाने ठेवला विश्वास ,
आमचे जीवन झाला तु
तुच आमचा श्वास!
बाळराजा मिळो तुज
आरोग्य,आयुष्य उदंड
यश, सुख लाभावे तुला
मिळो प्रेम, स्नेह अखंड!!

**-सौ.प्रियंका गौरव जावळे.**
संभाजीनगर.

## आयुष्य पान

कधी दुःख कधी सुख
कधी हर्ष कधी ताण
करून चांगले कर्म
लिहू आयुष्याचं पान

लुटू हर्ष जीवनाचा
जगून प्रत्येक क्षण
करू अथक संघर्ष
होईल सोपे जीवन

कधी न खचू मनाने
झाला जरी अपमान
करू आपली प्रगती
येईल जीवनी त्राण

जोडून खरी माणसे
साधू माणुसकी जाण
करू परमार्थ प्रण
सजवू आयुष्य पान

करून मनी निर्धार
गाठू ध्येय, प्राप्तू मान
करून साकार स्वप्ने
मढवू आयुष्य पान

जिंकू द्वेषाला प्रेमाने
स्नेहत्वाने राहू छान
बाळगून आपुलकी
रंगवू आयुष्य पान

**- मनोज शोभाबाई प्रकाश अग्रवाल,**
**छत्रपती संभाजीनगर**

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559